


दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे सहसंपादक : तुकाराम कामठे




वर्ष ५ । अंक १७२ । गुरुवार २६ मार्च २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २ https://epaper.dainkaakarshan.com E-mail- dainikaakarshan@gmail.com RNI NO. MAHMAR/2021/84322

## पीडित महिलांचे व्हिडिओ व्हायरल करणाऱ्या कोपरगावातील दोघांना अटक

### भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर –** भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणातील पीडित महिलांचे व्हिडिओ सोशल मीडियावर प्रसारित करणा–या कोपरगावातील दोघांना पोलिसांनी अटक केली आहे. राहुल गंगाधर शिंदे (रा. शिवाजी रोड, कोपरगाव) व योगेश पंढरीनाथ आढाव (वय ५० वर्षे रा. मोहिनीराजनगर, कोपरगाव) अशी अटक आरोपींची नावे असून, त्यांचा तिसरा साथीदार संदीप गजें (रा. माजलगाव जि.बीड) याचा शोध सुरु आहे.

भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याने जादूटोणा करण्याच्या बहाण्याने महिलांवर लैंगिक अत्याचार केले. या प्रकरणातील पीडित महिलांचे अश्लील व्हिडीओ एका व्हॉटस्अप ग्रुपवर प्रसारीत केले असल्याचे दिसून आले. याबाबत कोपरगाव शहर,पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २९४ (२), ३ (५) सह माहिती तंत्रज्ञान कायदा २००० चे कलम ६७ (अ) प्रमाणे दिनांक २५ रोजी रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून, दोघांना अटक करण्यात आली आहे..पुढील तपास कोपरगाव शहर पोलीस करीत आहेत.

### सोशल मीडियावर पोलिसांची नजर, नागरिक, प्रसिद्धीमाध्यमांना आवाहन

सदरचे प्रकरण हे संवेदनशील व गंभीर असल्याने अतिशय गोपनीयरित्या महिलांची ओळख उघड होणार नाही याची खबरदारी घेऊन तपास यंत्रणा काम करीत आहे.यासंदर्भातील पीडितांचे व्हिडिओ, छायाचित्रे कोणीही प्रसारीत करू नयेत. सर्व नागरिक, सर्व सोशल मीडिया इन्फ्लुएन्सर, सर्व न्यूज चॅनल्स, न्यूज चॅनल्सचे इन्स्टाग्राम हॅन्डल्स, युट्यूब न्यूज पोर्टल्स, ऑनलाईन न्युज पोर्टल्स, इन्स्टाग्राम न्यूज पोर्टल्स व इतर सोशल मीडियाने याबाबत दक्षता घ्यावी. भोंदूबाबा अशोक खरात प्यारकरणात सरकारवाडा पोलीस ठाणे (नाशिक) येथे विविध गुन्हे दाखल करण्यात आलेले आहेत. त्याचा तपास विशेष तपास पथकाकडून सुरु आहे. असे निदर्शनास आले आहे की, या गंभीर गुन्हयातील पीडित महिलांचे अश्लील व्हिडीओ सोशल मीडियावर वारंवार प्रसारीत करण्यात येत आहेत. याद्वारे सर्वांना आवाहन करण्यात येते की, प्रत्येक व्यक्तीचे सोशल मीडिया अकाऊंट व प्रसिद्धीमाध्यमांवर सायबर विभागाचे पोलीस लक्ष ठेवून आहेत. त्यामुळे कोणाकडेही पीडित महिलेची ओळख, तिच्या नातेवाईकांची ओळख, तिच्या घराची ओळख, तिच्या कूटूंबाची ओळख उघड होईल असे व्हिडीओ किंवा संबंधित महिलांचे अश्लिल व्हिडिओ किंवा ए आय जनरेटेड मॉर्फ केलेले व्हिडिओ/छायाचित्रे असल्यास ते तात्काळ डीलीट करावे अगर सोशल मीडिया व प्रसिद्धीमाध्यमांवर प्रसारीत करू नये. असे व्हिडिओ प्रसारीत केल्यास संबंधितांवर किंवा संबंधित प्रसिद्धीमाध्यमांच्या ग्रूप ॲडमिनवर गुन्हा दाखल करण्यात येऊन, त्यांना अटक करून, कायदेशीर कारवाई करण्यात येईल, याची सर्वांनी नोंद घ्यावी, असा इशारा पोलिसांनी दिला आहे.

## खासदार नीलेश लंके यांनी घेतली संरक्षण मंत्र्यांची भेट

### पाच महत्त्वाच्या निवेदनांद्वारे विविध प्रश्नांवर ठोस पाठपुरावा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** खासदार नीलेश लंके यांनी संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची नवी दिल्ली येथे भेट घेऊन मतदारसंघाशी संबंधित विविध महत्त्वाच्या व प्रलंबित प्रश्नांवर सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी एकूण पाच निवेदने सादर करत तातडीने कार्यवाही करण्याची मागणी केली.



खासदार लंके यांनी माजी सैनिकांना माजी सैनिक अंशदायी आरोग्य योजनेअंतर्गत (ईसीएचएस) मिळणाऱ्या आरोग्य सुविधांबाबत गंभीर प्रश्न उपस्थित केला. अहिल्यानगर येथील माजी सैनिक संतोष जगन्नाथ पिसे यांना डायलिसिससारख्या अत्यावश्यक उपचारासाठी संबंधित रुग्णालयाने ईसीएचएस अंतर्गत सेवा देण्यास नकार दिल्याची बाब त्यांनी मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. या प्रकारामुळे संबंधित रुग्णाच्या जीवाला धोका निर्माण झाला असून, अशा समस्या इतर माजी सैनिकांनाही भेडसावत असल्याचे त्यांनी नमूद केले. याबाबत तात्काळ योग्य त्या सूचनांचे आदेश देण्याची मागणी करण्यात आली.

तसेच, मृत सैनिक योगेश बापूराव शिर्के यांच्या पत्नीच्या प्रकरणात सहानुभूतीपूर्वक विचार करून तिला पेन्शनरी लाभ देणे अथवा शासकीय सेवेत पुनर्वसन करण्याची मागणी लंके यांनी केली. संबंधित विधवा आपल्या अल्पवयीन मुलासह अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत जीवन जगत असल्याचे त्यांनी सांगितले.

याशिवाय, अहिल्यानगर व राहुरी तालुक्यातील सैन्य क्षेत्रालगतच्या गावांमध्ये बांधकामासाठी अन–आपत्ती प्रमाणपत्र संदर्भातील परिपत्रकांमधील विरोधाभासामुळे निर्माण झालेल्या गोंधळाचा मुद्दा त्यांनी मांडला. २०११ व २०१६ मधील परस्परविरोधी आदेशांमुळे स्थानिक प्रशासन व सैन्य अधिकाऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला असून, त्याचा फटका नागरिकांना बसत आहे. या पार्श्वभूमीवर एकसंध, स्पष्ट आणि अद्ययावत मार्गदर्शक तत्त्वे तातडीने जारी करण्याची मागणी करण्यात आली. स्थानिक शेतकरी व नागरिकांच्या मालकी हक्कांवर या निर्बंधांचा परिणाम होत असल्याचे निदर्शनास आणून देत, त्यांच्या वैध हक्कांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी, अशी मागणीही लंके यांनी केली.

तसेच प्रशासन, सैन्य यंत्रणा आणि नागरिक यांच्यात समन्वय साधण्यासाठी पारदर्शक कार्यप्रणाली विकसित करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली. यासोबतच, अहमदनगर स्टेशन मुख्यालयाच्या अखत्यारित येणाऱ्या कपूरवाडी तलावात साचलेला गाळ ■ पान ४ वर

## नवीपेठेतील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव भक्ती, उत्साह आणि जयघोष

### अखंड नामस्मरण, भजन–कीर्तनाने परिसर दुमदुमला; हजारो भाविकांची उपस्थिती

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टच्या वतीने नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव अत्यंत भक्तिभाव, शिस्तबद्ध नियोजन आणि उत्साहपूर्ण वातावरणात मोठ्या दिमाखात संपन्न झाला. पहाटेपासूनच मंदिर परिसरात भाविकांची प्रचंड गर्दी उसळली होती. 'जय श्रीराम'च्या घोषणांनी आणि ''श्रीराम जय राम जयजय राम'' या अखंड मंत्रजपाने संपूर्ण परिसर भारावून गेला होता.

पहाटे ६ वाजता जलाभिषेक, दुग्धाभिषेक व देखण्या शृंगाराने कार्यक्रमाची मंगल सुरुवात झाली. आकर्षक फुलांची सजावट, रंगीबेरंगी विद्युत रोषणाई आणि अयोध्येच्या धर्तीवर उभारलेली सजावट यामुळे मंदिर परिसर दिव्य आणि प्रसन्न भासत होता. सकाळी मंगल आरतीनंतर भाविकांनी मोठ्या भक्तिभावाने दर्शन घेतले.

सकाळी ११ ते दुपारी १२ या वेळेत सामूहिक नामजप व हनुमान चालीसा पठणाचे आयोजन



करण्यात आले होते. यावेळी शेकडो भाविक एकसुरात मंत्रोच्चार करताना दिसले. मंत्रजपाच्या गजरात वातावरण पूर्णपणे भक्तिमय झाले होते. दुपारी बरोबर १२ वाजता प्रभु श्रीरामचंद्रांचा जन्मोत्सव सोहळा पार पडताच मंदिर परिसरात टाळ्या, घंटानाद आणि ''जय श्रीराम''च्या जयघोषाने जल्लोष उसळला.

भाविकांना सुरळीत व जलद दर्शन मिळावे यासाठी ट्रस्टच्या वतीने दर्शनबारी, स्वतंत्र प्रवेश–निर्गमन व्यवस्था, मंडप, पिण्याच्या पाण्याची सोय आदी सुविधा उत्तम प्रकारे उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. ■ पान ४ वर

## शासनाच्या योजना कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचवावे – आ. काशिनाथ दाते सर

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** कान्हुर पठार ता. पारनेर महाराष्ट्र शासनाच्या महसूल विभागामार्फत आयोजित ''छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीर'' आज उत्साहात व मोठ्या प्रतिसादात पार पडले. या शिबिरात पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांनी जनतेच्या समस्या थेट ऐकून त्यावर तत्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश देत प्रशासनाला अधिक लोकाभिमुख होण्याचे आवाहन केले.

यावेळी आमदार दाते म्हणाले, ''शासनाच्या योजना व सेवा या कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचल्या पाहिजेत. गावपातळीवर अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांच्या अडचणी जागेवरच सोडवणे, हेच प्रशासनाचे खरे यश आहे. महसूल, कृषी, परिवहन, आरोग्य, शिक्षण, सहकार अशा विविध विभागांनी एकत्र येऊन जनतेला दिलासा देण्याचा हा उपक्रम अत्यंत उपयुक्त आहे.'' ते पुढे म्हणाले, ''शेतकरी, महिला, विद्यार्थी आणि सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या तात्काळ मार्गी लावण्यासाठी अशा शिबिरांची गरज आहे. शासन जनतेच्या सेवेसाठी कटिबद्ध असून प्रत्येक पात्र



लाभार्थ्यापर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी आपण सर्वांनी समन्वयाने काम केले पाहिजे. शासनाच्या योजना थेट जनतेपर्यंत पोहोचून त्यांच्या अडचणी जागेवरच सुटल्या पाहिजेत. अशा शिबिरांमुळे सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळत असून शासनाच्या ह्या उपक्रमाची फलश्रुती सर्वसामान्य नागरिकांच्या समाधानात शोधल्यास निच्छितच सापडत असून एक जनतेचा प्रतिनिधी म्हणुन ह्या गोष्टीचा मला मनस्वी आनंद आहे.''

या शिबिरात भाजपचे राज्य कार्यकारिणी सदस्य विश्वनाथ कोरडे, माजी जिल्हा ■ पान ४ वर

## आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य कौतुकास्पद - आ. संग्राम जगताप

### स्व. अरुण काका जगताप जयंतीनिमित्त महाआरोग्य शिबिर संपन्न । साई द्वारका सेवा ट्रस्टचा पुढाकार; १५ नामांकित रुग्णालयांतून मोफत तपासणी । मोफत तपासणी, आयुष्यमान कार्ड वाटप आणि गरजू रुग्णांच्या शस्त्रक्रियेचा खर्चही ट्रस्ट उचलणार



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट, अहिल्यानगर मनपा तसेच आयुष्यमान भारत आणि महात्मा फुले जन आरोग्य योजना यांच्या संयुक्त विद्यमाने महाआरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाले.

समाजामध्ये आरोग्याबाबतच्या नवनवीन समस्या निर्माण होत असून, धकाधकीच्या जीवनशैलीमुळे नागरिक आरोग्याकडे अक्षरशः दुर्लक्ष करत आहेत. दिवसेंदिवस आरोग्यसेवा महाग होत चालल्यामुळे सर्वसामान्य नागरिक उपचारांपासून दूर राहतात. अशा परिस्थितीत नागरिकांचे आरोग्य चांगले राहावे, त्यांच्या आजारांचे वेळेवर निदान होऊन योग्य उपचार मिळावेत या उद्देशाने साई द्वारका सेवा ट्रस्ट सातत्याने कार्यरत आहे. ट्रस्टचे आरोग्य क्षेत्रातील कार्य अत्यंत कौतुकास्पद असून केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे कामही ते करत आहेत, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.

ते पुढे म्हणाले की, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव यांनी या महाआरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्याबाबत जनजागृती करण्याचे काम केले आहे. तसेच सर्वसामान्य कुटुंबातील नागरिकांना मोफत आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत आरोग्य कार्डचे वाटप करून समाजाप्रती आपले कर्तव्य पार पाडले आहे.

श्री साई द्वारका सेवा ट्रस्ट, अहिल्यानगर मनपा व आयुष्यमान भारत, महात्मा फुले जन आरोग्य योजना यांच्या वतीने आयोजित या महाआरोग्य शिबिराचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी महापौर ज्योतीताई गाडे, उपमहापौर ॲड. धनंजय जाधव, माजी महापौर भगवानराव फुलसौंदर, माजी ■ पान ४ वर

## ग्रामपंचायत बेलवंडी बु.।।

ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर फोन : (०२४८७) २५०३२४

### आठवडी बाजार करवसुली ठेका देण्यासाठी नोटीस

सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रामपंचायत बेलवंडी बु.।। ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर यांजकडून उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की, मौजे बेलवंडी बु. ।। ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर येथील आवठडी बाजार करवसुलीचा ठेका देणेबाबत नोटीस
तमाम लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे ग्रामपंचायतीच्या गावी भरणाऱ्या आठवडी बाजार कराच्या सन २०२६/२०२७ साठी करवसुलीचा जाहीर लिलाव सोमवार दि. ३०/०३/२०२६ रोजी ठिक १०.०० वाजता ग्रामसचिवालय कार्यालय बेलवंडी बु ।।, ता. श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर येथे होणार आहे. तरी ज्यांना लिलावात भाग घ्यावयाचा आहे. त्यांनी उपनिर्दीष्ट दिवशी व उल्लेख केलेल्या ठिकाणी वेळेवर हजर रहावे. लिलावाच्या अटी, शर्ती व नियम सुट्टी खेरीज कार्यालयीन वेळेत पहावयास मिळतील.

| अ.नं. | लिलावाचा प्रकार | करवसुली कालावधी | डिपॉझीट रक्कम | लिलावाची तारीख व वेळ | लिलावाचे ठिकाण |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | आठवडी बाजार २०२६/२०२७ | ०१/०४/२०२६ ते ३१/०३/२०२७ | १०,०००/- व सही करून. चार कोरे चेक व रू. १००/- चा कोरा स्टॅम्प | सोमवार दिनांक ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता | ग्रामपंचायत कार्यालय बेलवंडी बु ।। ता. श्रीगोंदा जि. अहिल्यानगर |

कळावे सर्वांना जाहीर व्हावे.

–आपले नम्र–

**साबळे ए. एस.**
**ग्रामपंचायत अधिकारी**
बेलवंडी बु ।। ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर

**बाळासाहेब ढवळे**
**उपसरपंच**
बेलवंडी बु।।, ता. श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर

**ऋषिकेश शेलार**
**सरपंच**
बेलवंडी बु।।, ता. श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर

## दै. आकर्षण निवडक

### घरकुल योजनेत वंचितांना समाविष्ट करा रिपब्लिकन सेनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**अहिल्यानगर - शहरातील अनेक गोरगरिब कुटुंबे गेल्या अनेक वर्षांपासून घरकुल योजनेपासून वंचित राहिल्याने त्यांना महानगरपालिकेच्या घरकुल योजनेत तातडीने समाविष्ट करावे, अशी मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनातून करण्यात आली. सध्याच्या परिस्थितीत गोरगरिबांसाठी घर खरेदी करणे किंवा जागा घेणे अत्यंत कठीण झाले आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या मालकीच्या वारुळाचा मारुती व काटवन खंडोबा परिसरातील मोकळ्या भूखंडांवर घरकुल योजना राबवून गरजूंना परवडणाऱ्या दरात घरे उपलब्ध करून द्यावीत, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.महापालिकेने २०१२-१३ व २०१४ या कालावधीत याच ठिकाणी घरकुल योजना राबवून अनेक गरजू कुटुंबांना लाभ दिला होता. त्याच धर्तीवर पुन्हा एकदा प्रकल्प राबविल्यास शहरातील हातावर पोट भरणाऱ्या नागरिकांना मोठा दिलासा मिळू शकतो, असेही नमूद करण्यात आले आहे.एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास योजनेअंतर्गत फेज-१ व फेज-२ मध्ये वारुळाचा मारुती व काटवण खंडोबा परिसरात पूर्वी सदनिका वितरित करण्यात आल्या होत्या. मात्र, गेल्या १० ते १२ वर्षांपासून अहिल्यानगर महानगरपालिकेकडून नवीन घरकुल योजना राबविण्यात आलेली नाही. त्यामुळे नवीन प्रकल्प सुरू करून वंचित घटकांना न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच, बोल्हेगाव-गांधीनगर रोडवरील म्हस्के कॉलेजजवळील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाच्या सुशोभीकरणासाठी मंजूर निधीचा वापर करून परिसरातील अतिक्रमणे हटवून लवकरात लवकर काम पूर्ण करावे, अशीही मागणी निवेदनात करण्यात आली.यावेळी रिपब्लिकन सेनेचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे, जिल्हा कार्याध्यक्ष बाळासाहेब वाघमारे, महिला आघाडीच्या शहराध्यक्ष सुनीता शिंदे, नेहा जावळे, सविता कवडे, बबीता शिंदे, पोपट रोकडे, रतन भोसले, वैशाली शिरसाटे, मंगल बरकाडे आदींसह महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.**

### करोडो रुपयांचे शिवधनुष्य पेलविण्यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन

**भगवानगड - श्री क्षेत्र भगवानगडावरील नियोजित श्री संत ज्ञानेश्वर माऊलींच्या करोडो रुपये खर्च असणाऱ्या मंदिरासाठी महाराष्ट्रातून मोठ्या प्रमाणात देणग्या सुरू आहेत. गडाच्या भक्तवर्गांपैकी अनेक गावांनी आपापल्या देणग्या जाहीर करून देणगीची रक्कम गडाचे मठाधिपती, न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांकडे सुपूर्द केली आहे. देणगीचे बाकी असलेले गावकरी बाबांना सप्ताहानिमित्त किंवा इतर धार्मिक कार्यक्रमानिमित्ताने गावात बोलावून बाबांसमोर आपापले देणगीचे आकडे जाहीर करतात. नंतर संपूर्ण ग्रामस्थ एक विशिष्ट तारीख ठरवून बाबांना बोलावून घेतात व जाहीर केलेली देणगी बाबांकडे सुपूर्द करतात. श्री क्षेत्र भगवानगडाचे विद्यमान मठाधिपती, ह.भ.प.न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबांनी श्री क्षेत्र भगवानगडावर माऊलींचे मंदिर बांधण्याचे ठरविले आणि संपूर्ण महाराष्ट्रातून मंदिरासाठी देणग्यांचा ओघ सुरु झाला आहे. न्यायाचार्य डॉ.श्री.नामदेव महाराज शास्त्री बाबा हे मौजे पानेगांव (ता.अंबड, जि. जालना) येथे आले असता ग्रामस्थांनी गडावरील माऊलींच्या मंदिरासाठी देणगी द्यायचे ठरविले. त्यानुसार ग्रामस्थांनी आपापल्या देणगीचे आकडे जाहीर केले. जाहीर केलेल्या संपूर्ण आकडेवारीची एकूण गोळाबेरीज ही १ कोटी २६ लाख रुपये झाली. नोकरी/व्यवसायानिमित्ताने बाहेरगावी असणाऱ्या ग्रामस्थांच्या देणगीचे आकडे आणखी बाकी आहेत. एकंदरीत श्री क्षेत्र भगवानगडाचा भक्तवर्ग गडावरील माऊलींच्या मंदिराला आर्थिक स्वरुपात हातभार लावण्यासाठी सरसावलेला दिसून येत आहे. त्यामुळे या अभूतपूर्व मंदिरासाठी सर्व ग्रामस्थांनी सहकार्य करावे असे आवाहन श्री क्षेत्र भगवानगड ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.**

# रुग्णांच्या चेहऱ्यावर आनंद पाहणे हेच आमचे खरे समाधान – मनीषा मुनोत

**आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने मोफत ईएनटी तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद; ६६ रुग्णांनी घेतला लाभ**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** श्री आनंदऋषी हॉस्पिटल अँड मेडिकल रिसर्च सेंटरच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य मोफत विविध रोग तपासणी शिबिरांच्या मालिकेत कान, नाक व घसा (ईएनटी) तपासणी शिबिराचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या शिबिरामध्ये नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी व मार्गदर्शनाचा लाभ घेतला. सकाळपासूनच रुग्णांची गर्दी दिसून येत होती आणि प्रत्येक रुग्णाला अत्यंत काळजीपूर्वक सेवा देण्यात आली.

या शिबिराचे उद्घाटन आयोजक स्व. सुशिलाबाई पन्नालाल मुनोत (मिरी वाला) यांच्या स्मरणार्थ दिलीप मुनोत, ललित मुनोत, मदन मुनोत, प्रीतम मुनोत, प्रणव मुनोत, चंदनबालाजी मुनोत, अनिता मुनोत, मनीषा मुनोत, प्रियांका मुनोत, प्रिया मुनोत, हिंदान मुनोत एवं मुनोत परिवार तसेच श्री पूजन इन्फ्रा अँड डेव्हलपर्स, अहिल्यानगर यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून करण्यात आले. या प्रसंगी डॉ. अतुल तुपे, डॉ. सुकेशनी गाडेकर, डॉ. अझर शेख, डॉ. सुरज कर्डीले, संतोष बोथरा, डॉ. आशिष भंडारी, सुभाष मुनोत, मानकचंद कटारिया, प्रकाश छल्लाणी आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना आयोजक मनीषा मुनोत यांनी भावनिक शब्दांत सांगितले की, रुग्ण जेव्हा हॉस्पिटलमध्ये येतात तेव्हा त्यांच्या चेहर्यावर वेदना, चिंता आणि अस्वस्थता असते. मात्र येथे त्यांना योग्य निदान, वेळेवर उपचार आणि मानवी स्पर्श मिळाल्यानंतर ते हसतमुखाने परत जातात. हाच आमच्यासाठी सर्वात मोठा समाधानाचा क्षण असतो. समाजाप्रती असलेली आपली जबाबदारी ओळखून अशा मोफत शिबिरांचे आयोजन करणे ही काळाची गरज आहे. प्रत्येक गरजू रुग्णापर्यंत आरोग्य सेवा पोहोचवणे हेच आमचे ध्येय असून पुढील काळातही असे उपक्रम सातत्याने राबवले जातील.

पुढे त्या म्हणाल्या की, आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत लोक आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. लहानसहान त्रास मोठ्या आजाराचे रूप घेईपर्यंत दुर्लक्ष केले जाते. त्यामुळे अशा तपासणी शिबिरांमुळे आजाराचे वेळेत निदान होऊन गंभीर परिणाम टाळता येतात. समाजातील प्रत्येक घटकाला परवडणारी व सुलभ आरोग्य सेवा मिळावी यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

यावेळी डॉ. अतुल तुपे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, कान, नाक आणि घसा यांसारख्या अवयवांचे आजार अनेकदा सुरुवातीला किरकोळ वाटतात, मात्र दुर्लक्ष केल्यास ते गंभीर होऊ शकतात. वेळेवर तपासणी आणि योग्य उपचार केल्यास मोठ्या शस्त्रक्रिया किंवा गुंतागुंती टाळता येतात. त्यामुळे नागरिकांनी नियमित आरोग्य तपासणी करण्याची सवय लावावी.

ते पुढे म्हणाले की,ही सेवा केवळ वैद्यकीयच नव्हे तर मानवतेची मोठी सेवा आहे. त्यांनी नागरिकांना आरोग्याबाबत जागरूक राहण्याचे आणि वेळोवेळी तपासणी करून घेण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात संतोष बोथरा यांनी सांगितले की, मनीषा मुनोत परिवाराचा हॉस्पिटलला तसेच जैन श्रावक संघाला नेहमीच मोलाचा पाठिंबा मिळत असतो. त्यांच्या सहकार्यामुळेच अशा सामाजिक उपक्रमांचे आयोजन अधिक प्रभावीपणे करता येते. समाजसेवा हीच खरी ईश्वरसेवा आहे या भावनेतून हा परिवार सतत कार्यरत आहे, ही अत्यंत कौतुकास्पद बाब आहे.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. आशिष भंडारी यांनी प्रभावीपणे केले तर प्रकाश छल्लाणी यांनी उपस्थितांचे आभार मानले. या शिबिरामध्ये एकूण ६६ रुग्णांनी तपासणी व उपचाराचा लाभ घेतला. तज्ज्ञ डॉक्टरांनी प्रत्येक रुग्णाची सखोल तपासणी करून आवश्यक ते मार्गदर्शन व औषधोपचार सुचवले.

या उपक्रमामुळे परिसरातील रुग्णांना मोठा दिलासा मिळाल्याची भावना व्यक्त होत असून, भविष्यातही अशा उपयुक्त आरोग्य शिबिरांचे आयोजन व्हावे, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त करण्यात आली. अशा सामाजिक बांधिलकी जपणार्या उपक्रमांमुळे आरोग्य सेवा खर्या अर्थाने लोकांपर्यंत पोहोचत असल्याचे चित्र पाहायला मिळाले.

## उच्च शिक्षण हे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार असले पाहिजे: डॉ. माहेश्वरी गावित



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** उच्च शिक्षण हे गुणवत्तापूर्ण व दर्जेदार असले पाहिजे जे की माणसाला माणूस म्हणून जगण्याचे तत्व शिकवेल असे प्रतिपादन डॉ. माहेश्वरी गावित यांनी केले त्या प्रमुख वक्त्या म्हणून बोलत होत्या.

पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त ''एकात्म मानवदर्शन'' या विषयावर विशेष कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. ही कार्यशाळा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे, श्री ढोकेश्वर महाविद्यालय, टाकळी ढोकेश्वर व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आली होती. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे ज्येष्ठ विश्वस्त मा. श्री. सिताराम खिल्लारी उपस्थित होते. विद्यार्थी हा वाचनापासून दूर चालला आहे. त्यासाठी आपण प्रयत्न करायला हवे असे मत त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात व्यक्त केले.

प्रमुख वक्त्या म्हणून हिंद सेवा मंडळाचे पेमराज सारडा महाविद्यालय, अहिल्यानगर येथील प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित यांनी मार्गदर्शन केले. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. लक्ष्मणराव मतकर यांनीही व्यक्तीच्या मन, शरीर, बुद्धी आणि आत्मा यांचा एकत्रित समन्वय म्हणजे मानवाच्या व्यक्तिमत्वाचा विकास आहे असे मत व्यक्त केले.

यावेळी डॉ. माहेश्वरी गावित यांनी पंडित दीनदयाल उपाध्याय यांच्या ''एकात्म मानवदर्शन'' या तत्त्वज्ञानाचा सविस्तर उहापोह करताना भारतीय संस्कृतीतील समतोल विकास, सामाजिक बांधिलकी आणि स्वावलंबन यांचे महत्त्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांनी कार्यशाळेत उत्स्फूर्त सहभाग घेत विविध प्रश्न विचारून विषयाची अधिक सखोल माहिती करून दिली. कार्यक्रमासाठी प्राध्यापक, शिक्षेकेत्तर सेवक व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पारगाव मौला जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष तथा माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक बाबासाहेब बोडखे यांनी नगर तालुक्यातील पारगाव मौला येथील जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना स्कूल बॅगसह शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. तर माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त मागील वर्षी लावण्यात आलेल्या झाडांचे संवर्धन करुन यंदा त्या झाडांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. तसेच मुलांसाठी तयार केलेल्या लाल मातीच्या क्रीडांगणाचे लोकार्पण गुणे आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप यांच्या हस्ते झाले.

प्रारंभी झाडांचे पूजन करण्यात आले. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड, प्राथमिकचे शिक्षणाधिकारी भास्करराव पाटील, बाबासाहेब बोडखे, शहर बँकेचे व्हाईस चेअरमन प्रा. माणिक विधाते, माध्यमिक शिक्षक सोसायटीचे संचालक सुरज घाटविसावे, प्राचार्य मारुती लांडगे, बाळासाहेब बोडखे, शरद दळवी, बबन शिंदे, बाजार समितीचे माजी उपसभापती संतोष म्हस्के, धनगरवाडीचे माजी सरपंच वीरकर आण्णा, पारगावचे सरपंच वैभव बोठे, गट शिक्षणाधिकारी तृप्ती कोलते, अमोल बोडखे, शांतीनाथ खेडकर, राजू बोडखे, पै. विराज बोडखे, बबन शिंदे, अमोल क्षीरसागर, देसाई सर, देवीदास गीते, श्रीराम थोरात, संजय शिरसाठ, किरण डहाणे, उमेश भोईटे, शिंदे सर आदींसह शालेय शिक्षक, विद्यार्थी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रास्ताविकात बाबासाहेब बोडखे म्हणाले की, मागील वर्षी स्व. अरुणकाका जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त शाळेत लावलेली झाडे बहरली आहे. दरवर्षी काकांच्या स्मरणार्थ गावात वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेतला जाणार आहे. ज्या शाळेत माझे प्राथमिक शिक्षण झाले, त्या शाळेप्रती जाणीव ठेऊन हा उपक्रम राबविण्यात आला आहे. स्व. अरुणकाकांनी अनेकांचे संसार उभे केले,

## टाकळी ढोकेश्वर येथे १८ घरकुलांचे भूमिपूजन; ३१ मार्चपर्यंत काम सुरू करण्याचे आदेश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**पारनेर–** आवास दिनानिमित्त टाकळी ढोकेश्वर येथे गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांनी भेट देऊन सुरू नसलेल्या घरकुल योजनांचा आढावा घेतला. यावेळी एकूण १८ घरकुल लाभार्थ्यांच्या हस्ते भूमिपूजन करून नारळ फोडण्यात आला.

भूमिपूजन करण्यात आलेल्या लाभार्थ्यांमध्ये सौ. मनीषा यादव, रामचंद्र मुरलीधर गद्रे, सम्राट पवार, युवराज पवार, राहुल सोन्याबापू आल्हाट, बाळू सोन्याबापू आल्हाट, गणेश बाळासाहेब पायमोडे, सिंधू नारायण साळवे, रावसाहेब भाऊ पायमोडे, संतोष सखाराम उंडे, धनश्री गुलाब बेलकर, रामदास भागा पाचपुते, रमाकांत निवडुंगे, मिलिंद भागवत, कुंडलिक धुमाळ, बन्सी धुमाळ, संतोष जाधव व ठकाजी पायमोडे यांचा समावेश आहे.

या वेळी विस्तार अधिकारी बी. वाय. मेहेत्रे, प्रशासक तथा माजी सरपंच सौ. अरुणा प्रदीप खिलारी, ग्रामपंचायत अधिकारी बी. एम. दावभट, लिपिक लखन आल्हाट, बाळासाहेब जेजुरकर, शुभम कुटे आदी उपस्थित होते. यावेळी गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांनी स्पष्ट केले की, ३१ मार्च २०२६ पर्यंत ज्या लाभार्थ्यांची घरकुले सुरू होणार नाहीत, त्यांची घरकुले रद्द करण्याबाबत कारवाई करण्यात येणार आहे. त्यामुळे लाभार्थ्यांनी घरकुलाची कामे तातडीने सुरू करावीत, अशा सूचना देण्यात आल्या. तसेच सुरू नसलेल्या घरकुलांचा आढावा घेऊन ३१ मार्च २०२६ पर्यंत सर्व घरकुलांची कामे सुरू करण्याबाबत ग्रामपंचायत अधिकारी बी. एम. दावभट यांना आदेश देण्यात आले.

## देसवडेटेकडवाडी रस्ता मजबुतीकरणाला प्रारंभ; डॉ. प्रदीप दाते यांच्या हस्ते भूमिपूजन



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** अहिल्यानगर जिल्हा परिषद अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (सन २०२५-२६) मधून मंजूर झालेल्या देसवडे ते टेकडवाडी रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण (अंदाजे २० लाख रुपये) या महत्त्वाच्या कामाचे भूमिपूजन पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सर यांच्या वतीने डॉ. प्रदीप दाते यांच्या हस्ते संपन्न झाले.

अर्थसंकल्पीय अधिवेशन २०२६ निमित्त आमदार दाते सर व पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील साहेब मुंबईत असल्याने त्यांच्या वतीने डॉ. दाते यांनी या कामाचा शुभारंभ केला. या रस्त्यामुळे परिसरातील नागरिकांची दळणवळण व्यवस्था अधिक सुलभ होणार असून ग्रामीण भागाच्या विकासाला चालना मिळणार आहे.

यावेळी पांडुरंग गुंड, बंडू औटी, भाऊसाहेब टेकूडे, संपत तोरकड, बाजीराव शिंदे, बबन गुंड, धोंडिभाऊ दाते, माऊली दाते, नवनाथ दाते, पोपट शिंदे, सुरेश तोरकड, सहकारी दाते, भावका दाते, गोविंदा औटी, संदीप औटी, प्रकाश टेकूडे, बाळू गुंड, रभाजी टेकूडे, जिजाभाऊ टेकूडे, मछिंद्र गुंड, रोहिदास कानडे, शिवाजी टेकूडे, राजेंद्र गुंड, प्रदीप टेकूडे, प्रतुल टेकूडे, हरिचंद्र गुंड, दिपक गुंड, ज्ञानदेव दाते, प्रदीप गुंड, दिनकर दाते, मंगेश हुलावळे, एकनाथ गुंड, संतोष टेकूडे यांसह स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. प्रदीप दाते म्हणाले की, ''आमदार काशिनाथ दाते सरांचे काम हे नेहमीच समाजाभिमुख राहिले आहे. समाजाभिमुख कार्य म्हणजे केवळ विकासकामे उभारणे नव्हे, तर समाजातील प्रत्येक घटकाचा विचार करून त्यांच्या समस्या सोडवण्याच्या दृष्टीने त्या कामाचा किती उपयोग होईल याचा विचार करून ते काम उभे करणे, समाजातील प्रत्येक घटकांना समान न्याय देत त्यांना सक्षम करणे आणि त्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवण्यासाठी दाते सर कायम प्रयत्नशील राहिले आहेत. शिक्षण, आरोग्य, ग्रामीण विकास आणि दुर्बल घटकांच्या सक्षमीकरणासाठी केलेले त्यांचे गेल्या चार दशकातील कार्य पाहिले तर त्यांच्या समाजाभिमुख दृष्टीचा प्रत्यय येतो.''

या विकासकामामुळे देसवडे ते टेकडवाडी दरम्यान परिसरातील नागरिकांना वाहतूक करणे सुलभ होऊन त्यांच्या दैनंदिन जीवनात सकारात्मक बदल होणार असल्याने ग्रामस्थांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# अवकाळी पावसाचा धसका

**। पाचोड परिसरात गव्हाची कापणी करण्यासाठी हार्वेस्ट मशीनचा वापर । मजुरीचे दर वाढल्याचा परिणाम**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** अवकाळी पावसाच्या धसका घेतलेल्या शेतकऱ्यांनी सध्या सर्वत्र रब्बी पिकांची काढणी तसेच मळणीची लगबग सुरू केली आहे. पाचोडसह ता.पैठण परिसरात गव्हाचे उत्पादन घेत असलेल्या शेतकऱ्यांची गहू मळणीची लगबग सुरू झाली आहे. परिसरात गव्हाची कापणी करण्यासाठी हार्वेस्ट मशीनचा वापर करण्यावर शेतकऱ्यांचा कल वाढला आहे. पाचोड,लिंबगाव,थेर गाव,हर्षी,सोनवाडी,कोळी बोडखा,विहामांडवा,केकत जळगाव,वडजी,नांदर, दावरवाडी आदी भागात गव्हाची मोठ्या प्रमाणावर लागवड झालेली असून ज्याभागात गव्हाचे क्षेत्र मुबलक असतात.त्या ठिकाणी दरवर्षीप्रमाणे हरियाना पंजाब या परिसरातून हे यंत्र दाखल होतात.

पारंपरिक शेती करणारा शेतकरी आता गव्हाची लवकर मळणी करण्यासाठी हार्वेस्टर मशीनचा वापर करताना दिसून येत आहे. पारंपरिक शेतीत गहू काढण्याकरीता लागणारा वेळ पाहता या हार्वे स्ट मशीनने ते केवळ तासाभरात होऊ लागल्याने यांत्रिकी कर्णास शेतकरी पसंती देऊ लागला आहे. हार्वेस्टर मुळे शेतकरीही आता मजूर लावून वेळ वाया न घालवता कमीतकमी वेळात पिकांची मळणी करुन घरी धान्य आणण्याच्या गडबडीत आहेत.या मशीनमुळे आता गव्हाची मळणी झटपट व सोपी झाल्याने शेतकरी या यंत्राच्या सहाय्यानेच गहु काढत आहे.

### एक एकराचे काम अर्धा तासात

मजुरांचा वाढता तुटवडा, तसेच वाढलेली मजुरी पाहता शेतकऱ्यांना हार्वेस्टर मशीनने मळणी करणे अधिक सोयीचे वाटते.पारंपरिक पध्दतीने गहु काढावयाचा म्हटला तर एका एकराला दहा ते बारा महिला मजूर व चार हजारापर्यंत मजुरी लागते. त्यात हा गहू मळणीकरीता लागणारे मजुरांची मजुरी वेगळीच असते. परंतु गहु काढण्याच्या या हार्वेस्ट मशीनमुळे एकरी बावीसशे रुपये दर देऊन एक एकर क्षेत्रातील गहू अवघ्या अर्धा तासात काढून होतो. शेतकऱ्याला ह्या यंत्राच्या मदतीने केलेले कामामुळे कमी वेळात काम होत असल्याने यास मोठ्या प्रमाणावर मागणी वाढू लागली आहे.

### खर्च वाचविण्याचा फंडा शेतीला प्राधान्य

गहू सोंगणी साठी दररोज मजुरांचा शोध घ्यावा लागतो शिवाय मनासारखी मजुरी द्यावी लागते गहू होण्यासाठी तीन दिवस लागतात तीन दिवसांचा शोप काढला असता सहा हजार रुपये पर्यंत जातो. तसेच सोंगणी करून पुन्हा पेंड्या बांधणे ट्रॅक्टरने घरी नेणे मळणी यंत्राच्या साह्याने गहू काढणे व मळणी यंत्राचा अडीचशे ते तीनशे रुपये होते याप्रमाणे दर असल्याने खर्च वाढतो त्यामुळे शेतकरी हार्वेस्ट मशीनला प्राधान्य देत असल्याचे शेतकरी विकास धारकर यांनी बोलतांना सांगितले.

**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### केंद्रप्रमुख परीक्षा रद्दची आ. प्रशांत बंब यांची मागणी

अहिल्यानगर- मागील महिन्यात तीन व चार फेब्रुवारी रोजी राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या केंद्रप्रमुख मर्यादित विभागीय परिक्षेत अनियमितता झाल्याचा आरोप करून ही परीक्षा रद्द करून ती एमपीएससी मार्फत घेण्याची मागणी आमदार प्रशांत बंब यांनी केली आहे. राज्यातील प्राथमिक शिक्षकांमधून मर्यादित विभागीय परीक्षेच्या माध्यमातून केंद्रप्रमुख पदे भरण्यासाठी मागील फेब्रुवारी महिन्यात ही परीक्षा घेण्यात आली होती. तीन वर्षापासून रखडलेली ही परीक्षा ऐन राज्यातील जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुकीच्या धामधुमीत ऑनलाइन पद्धतीने घेण्यात आली.ही परीक्षा निर्धारित अभ्यासक्रमानुसार झाले नसल्याची व परीक्षेची काठिण्यपातळी सुमार दर्जाची असल्याची ओरड सातत्याने होत होती.हाच धागा पकडून आमदार बंब यांनी आरोप केला आहे की ही परीक्षा चौथी व पाचवीच्या स्कॉलरशिपच्या तुलनेने देखील अतिशय कनिष्ठ व सुमार दर्जाची काठिण्यपातळी असलेली होती.३८००० शिक्षक परीक्षार्थींपैकी तब्बल २८०२२ परीक्षार्थींना २०० पैकी १०० हून अधिक गुण आहेत,यातूनच या परीक्षेचा दर्जाहीनता दिसून येते,असा आरोप बंब यांनी केला आहे.यातून कोणत्या गुणवत्तेचे केंद्रप्रमुख निवडले जाणार आहेत. असा प्रश्न आमदार बंब यांनी शिक्षणमंत्र्यांना उद्देशून लिहिलेल्या या पत्रात केला आहे. अशी गुणवत्ताहीन परीक्षा घेऊन शिक्षण घेणारी भावी पिढी बरबाद होण्यापासून वाचविण्यासाठी निकाल जाहीर झाला असला तरी ही परीक्षा रद्द करून ती पुन्हा एकदा एमपीएससी मार्फत पुरेशा काठिण्यापातळीसह घेण्याची व परिक्षेच्या संपूर्ण प्रक्रियेची चौकशीची मागणी आमदार बंब यांनी केली आहे.

### हरदिन मॉर्निंग ग्रुप व भिंगार राष्ट्रवादीच्या वतीने गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये वृक्षारोपण

अहिल्यानगर- हरदिन मॉर्निंग ग्रुप व भिंगार राष्ट्रवादीच्या वतीने छावणी परिषदेच्या भगवान गौतम बुद्ध जॉगिंग पार्कमध्ये स्व. अरुणकाका जगताप यांच्या स्मरणार्थ झाडे लावण्यात आली. उद्यानात स्वच्छता अभियान राबवून रोकडेश्वर हमुमान मंदिरातील गरजूंना मिष्टान्न भोजनाचे वाटप करण्यात आले. माजी आमदार स्व. अरुणकाका जगताप यांच्या जयंतीनिमित्ताने हा उपक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमास सर्व पक्षीय पदाधिकारी उपस्थित होते. या उपक्रमातून स्व. अरुणकाका जगताप यांनी जोपासलेली सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न करण्यात आला. प्रारंभी अरुणकाकांच्या प्रतिमेस गुलाबांचा पुष्पहार अर्पण करण्यात आला. महापौर ज्योतीताई गाडे, नगर तालुका पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वारुळे व महेश नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक चेअरमन मन्नूशेठ झंवर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी भिंगार राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष संजय सपकाळ, छावणी परिषदेच्या माजी नगरसेविका शुभांगी साठे, उद्योजक चुन्नीलाल झंवर, रवीशेठ फल्ले, शिवसेनेचे सुनील लालबोंद्रे, रवी लालबोंद्रे, आरपीआयचे अमित काळे, मंगेश मोकळ, प्रकाश भिंगारदिवे, दीपक अमृत, रमेशराव वराडे, अशोक पराते, जहीर सय्यद, सर्वेश सपकाळ, दिलीप ठोकळ, जैद सय्यद, अनिल हळगावकर, ताराचंद ठोकळ, संजय भिंगारदिवे, रतन मेहेत्रे, दीपक लिपाने, शुभम भंडारी, अक्षय नागापुरे, अनंत सदलापूर, श्यामराव वागस्कर, अविनाश जाधव, रामनाथ गर्जे, प्रज्योतसिंग सागू, सुनील कर्डिले, राजू कांबळे, मुन्ना वाघस्कर, सुदाम गांधले, विकी भालसिंग, मच्छिंद्र बेरड, तुषार घाडगे गुरुजी, संपतराव बेरड, अरुण चव्हाण, सुधीर कपाळे, विशाल भामरे, दिनेश लंगोटे, सागर चवंडके, गणेश शिंदे, काशिनाथ साळुंके, प्रसाद भिंगारदिवे, श्रीकांत कदम, शशिकांत बोरुडे आदी उपस्थित होते. महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या की, स्व. अरुणकाका जगताप यांचे कार्य समाजासाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त अशा उपक्रमांचे आयोजन करणे कौतुकास्पद आहे. पर्यावरण, स्वच्छता आणि समाजसेवा या गोष्टींवर लक्ष दिल्यास समाज अधिक सक्षम होणार आहे. हरदिनच्या माध्यमातून सातत्याने सुरु असलेली वृक्षारोपण व स्वच्छता अभियानाची मोहिम कौतुकास्पद आहे. महापालिकेच्या माध्यमातून कचरामुक्त शहर व हरित शहर करण्यासाठी विशेष प्रयत्न सुरु असून, यामध्ये जनतेच्या सहभागाची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले.

# रामनवमीनिमित्त ५० किलोमीटर सायकल राईड उत्साहात

## प्रभू श्रीरामांच्या आदर्शातून फिटनेस, शिस्त आणि समाजएकतेचा संदेश



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** रामनवमीच्या पावन पर्वानिमित्त अहिल्यानगर सायकलिस्ट असोसिएशनतर्फे गुरुवार, दि. २६ मार्च २०२६ रोजी नगर शहरातील छत्रपती संभाजी रोडवरील महाराजा हॉटेल येथून सोलापूर रोड मार्गे दहीगाव साकत येथील प्राचीन राममंदिरापर्यंत भव्य सायकल राईडचे आयोजन करण्यात आले होते. धार्मिक श्रद्धा, आरोग्यजागर आणि पर्यावरणपूरक जीवनशैलीचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या राईडमध्ये १५ ते ७० वयोगटातील सुमारे ६० सायकलस्वार सहभागी झाले होते. एकूण सुमारे ५० किलोमीटरचे अंतर सायकलस्वारांनी यशस्वीरीत्या पूर्ण करत आपल्या फिटनेसची प्रचिती दिली. या राईड मध्ये विविध क्षेत्रातील शासकीय अधिकारी, डॉक्टर, शिक्षक, वकील तसेच सामाजिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.'जय श्रीराम'च्या घोषणांनी संपूर्ण मार्ग दुमदुमून गेला होता. मार्गावरील नागरिकांनीही सायकलस्वारांचे स्वागत करत उपक्रमाचे कौतुक केले.

दहीगाव साकत येथील प्राचीन राममंदिरात पोहोचल्यावर सर्व सहभागी सायकलस्वारांनी प्रभू श्रीरामांचे दर्शन घेतले व सामूहिक प्रार्थनेत सहभागी होत कार्यक्रमाची सांगता भक्तिभावाने करण्यात आली. धार्मिकतेसोबतच आरोग्य आणि पर्यावरणाचा संदेश देणारा हा उपक्रम सर्वांसाठी प्रेरणादायी ठरला.

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी काटेकोर नियोजन केले होते. राईडदरम्यान सुरक्षितता, वाहतुकीचे नियम आणि शिस्त यांचा विशेष आग्रह धरत सर्व सहभागींचे मार्गदर्शन करण्यात आले. 'सायकल वापरा, आरोग्य जपा' हा संदेश प्रभावीपणे पोहोचवण्यात आयोजकांना यश आले.

यावेळी नितीन पाठक यांनी आपल्या भाषणात प्रभू श्रीरामांच्या आदर्श जीवनमूल्यांचा उल्लेख करत सांगितले की, ''श्रीराम हे केवळ धार्मिक श्रद्धेचे प्रतीक नसून आदर्श आचरण, संयम आणि कर्तव्यनिष्ठेचे मूर्तिमंत उदाहरण आहेत. अशा पवित्र दिवशी सायकल राईडसारख्या उपक्रमातून समाजात सकारात्मक ऊर्जा निर्माण होते. फिटनेस आणि अध्यात्म यांचा संगम घडवणारे हे उपक्रम काळाची गरज आहेत.''

# रामनवमी व हनुमान जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताहाला उत्साहात प्रारंभ

## नालेगाव गाडगीळ पटांगणात धार्मिक वातावरण; हनुमान चालीसा कार्यक्रमात भाविकांची मोठी उपस्थिती



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नालेगाव येथील गाडगीळ पटांगणात श्री छत्रपती शिवराय तरुण मंडळ आणि पावन हनुमान व्यायाम शाळा यांच्या वतीने रामनवमी व हनुमान जयंतीनिमित्त अखंड हरिनाम सप्ताह कार्यक्रमाला उत्साहात सुरुवात करण्यात आली. पहिल्याच दिवशी सर्जेपुरा येथील दक्षिण मुखी हनुमान भजनी मंडळाच्या वतीने हनुमान चालीसा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला.

कार्यक्रमादरम्यान ''जय श्रीराम'' व ''जय हनुमान''च्या जयघोषाने संपूर्ण गाडगीळ पटांगण परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. भाविकांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत धार्मिक वातावरणाची अनुभूती दिली.

या धार्मिक सोहळ्यात श्री प्रभू हनुमानाचे रूप धारण केलेल्या कलाकारांनी विशेष आकर्षण निर्माण केले. भक्तांनी दर्शन घेत भावपूर्ण वातावरणात भजन-कीर्तनाचा आनंद लुटला. कार्यक्रमामुळे परिसरात धार्मिकतेची आणि उत्साहाची लहर निर्माण झाली होती.

धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून आपली संस्कृती जपली जात असून समाजामध्ये अध्यात्मिकतेची भावना दृढ होत असल्याचे यावेळी व्यक्त करण्यात आले. या हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून नागरिक एकत्र येऊन अध्यात्मिक वारसा पुढील पिढीकडे पोहोचवण्याचे काम होत आहे.

छत्रपती शिवराय तरुण मंडळाचे अध्यक्ष दत्तात्रेय मुदगल यांनी सुमारे ३४ वर्षांपूर्वी या अखंड हरिनाम सप्ताहाची सुरुवात केली होती. तेव्हापासून आजतागायत ही परंपरा अखंड सुरू असून दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरी केली जाते.

या कार्यक्रमात सर्व जाती-धर्मातील नागरिक सहभागी होत एकात्मतेचा संदेश देत आहेत. महिला भगिनींचीही मोठ्या संख्येने उपस्थिती असून त्यांच्या सहभागामुळे कार्यक्रमाची शोभा अधिकच वाढली.

अखंड हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक एकात्मतेचा संदेश दिला जात असून, अशा उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होत असल्याचे नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# स्व. अरुण काका जगताप जयंतीनिमित्त अरुणोदय गोशाळेत चारा वाटप

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** अहिल्यानगर ऑटो रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटनेच्या वतीने स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त अरुणोदय गोशाळा व पार्वतीबाई सुखदेव वेताळ गोशाळेत गायींसाठी चाऱ्याचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत चारा वाटप करण्यात आला.

या प्रसंगी माजी नगरसेवक अजय चितळे,चंदूभाऊ औषिकर,गणेश औटी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच संघटनेचे उपाध्यक्ष दत्ताभाऊ वामन, सचिव अशोक औषिकर, भगवान काटे सर, चंदूभाऊ औषिकर, संजय शहाणे, आशिष दांगडे, सुनील ढोणे, वेताळ मेजर, अविनाश वानखेडे, अभिषेक साठे, सतीश कांबळे, अजय साठे, राजेंद्र विधाते, बंटी गायकवाड, भीमा घोडके, रामदास सुतार, दिलीप गायकवाड, अनंता औषिकर, मनीष फुलडहाळे आदी पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थितांनी स्व. अरुण काका जगताप यांच्या कार्याची आठवण करून त्यांच्या सामाजिक योगदानाला अभिवादन केले. संघटनेच्या वतीने अशा सामाजिक उपक्रमांद्वारे समाजाशी नाळ जोडण्याचा प्रयत्न कायम राहील, असा निर्धारही व्यक्त करण्यात आला. तर या उपक्रमाबद्दल गो शाळेच्या वतीने आभार मानले.

# स्व. अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त स्नेहालयातील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन

## नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांचा सामाजिक उपक्रम

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त शहरात विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून स्नेहालय, आठरे पाटील वस्तीगृह येथील विद्यार्थ्यांना नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे यांच्या वतीने मिष्टान्न भोजन देण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद पाहायला मिळाला.

यावेळी चैतन्य बडे, केशव नागरगोजे, किसन भिंगारदिवे, भास्कर पालवे, पुंडलिक कातोरे, अंकुश बडे, अर्जुन बारगजे, सुनील खामनेकर, राहुल कातोरे, बाळू बडे, अंकुश पवार, अनिल आव्हाड, नवनाथ खांदवे, अशोक घायतडक, सोमनाथ बडे, दत्ता बडे, सचिन नरोडे, अनिल फुंदे, सतीश गायकवाड, नाना जाधव, दत्ता पवार, ॲड. आशिष पोटे, दिलीप पेटकर, लखन बडे, भरत बडे आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना नगरसेवक बाबुशेठ नागरगोजे म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप आणि नागरगोजे कुटुंबीयांचे अतूट स्नेहबंध होते. काकांनी नेहमीच समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन विकासाची वाटचाल केली. त्यांची समाजाप्रती असलेली बांधिलकी आणि प्रत्येक व्यक्तीबद्दलची आत्मीयता ही प्रेरणादायी होती.

ते पुढे म्हणाले की, काकांनी एमआयडीसीमधील उद्योगांना प्रोत्साहन देत कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी राजकारणापेक्षा माणुसकीला प्राधान्य देत लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांसाठी काम केले. त्यांच्या कार्याची आठवण जपण्यासाठीच आज स्नेहालय व आठरे पाटील वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना मिष्टान्न भोजन देण्याचा हा छोटासा प्रयत्न करण्यात आला आहे.

या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, अशा सामाजिक उपक्रमातून स्वर्गीय अरुण काका जगताप यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला.

# पैठणमधील विद्यार्थ्यांने ऑनलाइनने मागवलेला लॅपटॉप चक्क निघाला जुना

## पाच महिन्यापासून न्यायाच्या प्रतिक्षेत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** दिवसेंदिवस ऑंनलाईन खरेदीत फसवणुकी सारख्या प्रकारात वाढ होत आहे. तक्रार करुनही विविध कंपन्या ग्राहकांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करीत असल्याचे प्रकरण समोर येत आहे.त्यामुळे ऑंनलाईन खरेदीचा हायफाय समजला जाणारा हा व्यवहार फसवणुकीचा चालणारा गोरखधंदा तर नाही ना अशी चर्चा आता ग्राहकांमध्ये होतांना दिसते.

असाच एक प्रकार पैठण येथील व्यापारी हरेश किशनचंद सेजवानी यांच्या सोबत घडला.हरेश सेजवानी यांनी आपल्या विद्यार्थी असलेल्या मुलाच्या अभ्यासासाठी ऑनलाइन पद्धतीने लॅपटॉप मागवला होता, मात्र तो लॅपटॉप जुना तसेच बॅंकप देत नसल्याचे दिसून आले.त्यांनी तातडीने कंपनीकडे तक्रार या संदर्भात तक्रार केली. परंतु त्यांच्या तक्रारीकडे संबंधित कंपनीकडून कुठलेच पावले उचलत नसल्याने आणि तक्रार करुनही उपयोग न झाल्याने सेजवानी यांनी छ.संभाजीनगर पोलिस अधिक्षक (ग्रामीण ) यांच्याकडे या प्रकरणी तक्रार दाखल केली आहे.

हरेश सेजवानी यांनी १२ फेब्रुवारी २०२५ रोजी ६० हजार रुपये खर्चुन फ्लिपकार्टवरुन गेमिंग लॅपटॉप मागवला होता, हा लॅपटॉप नवा आहे. म्हणून कंपनीने गॅरंटी - वारंटी दिली होती,मात्र काही दिवसातच लॅपटॉपमध्ये बिघाड सुरुझाला. त्यानंतर एक नोव्हेंबर २०२५ रोजीलॅपटॉप आधिकृत सव्र्हस सेंटरमध्येदाखवण्यात आला. त्या ठिकाणी वारंटीसंपल्याचे सांगण्यात आले, त्यावरुन ग्राहकालादिलेला लॅपटॉप हा जुना व वापरलेला देण्यातआल्याचे सिद्ध झाले. याप्रकारावरुन हरेशसेजवानी यांनी जिल्हा ग्राहक यांच्याकडे तक्रार केली तिथे पण त्यांच्या तक्रारीकडे दुर्लक्ष करण्यात आले.मग त्यांनी आपली फसवणूक झाल्याप्रकरणी न्याय मागणीसाठी ग्रामिण पोलिसआधिक्षक यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. मुलाला अभ्यास करण्यासाठी फ्लिपकार्टवरुन गेमिंग लॅपटॉप ऑंनलाईन मागवला होता.परंतु तो वापर केलेला जुना लॅंपटॉंप निघाला या संदर्भात संबधित कंपनीकडे ऑंनलाईन तक्रार दाखल केली.परंतु त्यांकडून कुठलीच पावले उचलली गेली नाही.तसेच जिल्हा ग्राहककडे रीतसर तक्रार केली.त्यांच्या कडूनही काहीच हालचल दिसले नाही.म्हणून छ.संभाजीनगर जिल्हा पोलिस अधिक्षकाकडे तक्रार केली. दरम्यान पाच महिन्यापासून मुलाच्या लॅंपटॉंप बाबतीत झालेल्या फसवणुकीच्या संदर्भात न्यायच्या प्रतिक्षेत आहेत. (हरिश मेजवान ग्राहक पैठण)

# महाराष्ट्र आणि मॉरिशस या दोन्ही प्रदेशांमधील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे असून येथील मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे – रविंद्र चव्हाण, भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष

## मॉरिशसमधील मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न





**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र आणि मॉरिशस या दोन्ही प्रदेशांमधील मैत्रीचे नाते पिढ्यानपिढ्यांचे असून सातासमुद्रापार राहूनही येथील मराठी जनसमुदायाने आपली सांस्कृतिक नाळ अतिशय अभिमानाने जपली आहे असे गौरवोद्गार भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशस येथे काढले. मॉरिशसमधील मोका येथे महाराष्ट्र भवनाच्या विस्तारित वास्तूचा पायाभरणी सोहळा नुकताच रविंद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने महाराष्ट्र भवन वास्तूच्या विस्तारासाठी ८ कोटी रुपयांचा निधी मिळाला असल्याबाबद्दल उपस्थितांनी कृतज्ञता व्यक्त केली.

भाजपा प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशसच्या दोन दिवसीय दौऱ्यात उच्चस्तरीय मान्यवरांच्या भेटीगाठी घेत भारत-मॉरिशस संबंध अधिक दृढ केले. या दौऱ्यात रविंद्र चव्हाण यांनी मॉरिशसचे राष्ट्राध्यक्ष धरमबीर गोखुल यांच्या शासकीय निवासस्थानी सदिच्छा भेट घेतली. या भेटीत भारत-मॉरिशस मैत्री, ब्ल्यू इकॉनॉमी, पर्यटन, आणि सायबर सुरक्षा यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर चर्चा झाली. ''मॉरिशस हा भारताचा लहान भाऊ आहे,'' असे सांगत राष्ट्राध्यक्षांनी भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्याचे कौतुक केले. तसेच भारताने दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

त्याच बरोबर मॉरिशसचे परराष्ट्र मंत्री धनंजय रामफुल, आयटी व इनोव्हेशन मंत्री डॉ. अविनाश रामतोहूल आणि कला व सांस्कृतिक मंत्री महेंद्र गोंदीया यांच्यासोबत महत्त्वपूर्ण बैठका पार पडल्या. डॉ. रामतोहूल यांनी फर्ग्युसन कॉलेजमधील त्यांच्या शिक्षणाच्या आठवणी सांगत कृत्रिम बुद्धिमत्तेवर त्यांनी लिहिलेले पुस्तक भेट दिले. महाराष्ट्रातील रेशनिंग व्यवस्थेत जीपीएस तंत्रज्ञानाद्वारे पारदर्शकता आणण्याच्या निर्णयांचे त्यांनी विशेष कौतुक केले. तसेच मॉरिशसला आफ्रिकेसाठी एआय क्षेत्राचे 'प्रवेशद्वार' बनवण्यासाठी भारताचे सहकार्य आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. याचबरोबर सांस्कृतिक देवाण-घेवाण, वाचनालय, जागरी नृत्याचे युनेस्को नामांकन यांसारख्या विषयांवरही सकारात्मक चर्चा झाली.

या दौऱ्याचा विशेष ठळक भाग म्हणजे मोका येथे ''महाराष्ट्र भवन'' विस्तारित वास्तूचा शिलान्यास सोहळा. देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली ८ कोटी रुपयांच्या निधीतून उभारल्या जाणाऱ्या या वास्तूमुळे जागतिक स्तरावर मराठी अस्मिता अधिक बळकट होणार आहे. या वास्तूतील सभागृहाला ''स्वातंत्र्यवीर सावरकर'' यांचे नाव देण्यास स्थानिक समाजाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. तसेच मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनतर्फे आयोजित सांस्कृतिक कार्यक्रम, ''महा गणेशोत्सव २०२५'' निमित्त अनुदान वितरण आणि भारताचे मॉरिशसमधील उच्चायुक्त अनुराग श्रीवास्तव यांच्यासमवेत 'बिहार फेस्टिव्हल'ला दिलेली भेट या माध्यमातून सातासमुद्रापार भारतीय संस्कृतीचा जागर अधिक बळकट झाला. या सर्व घडामोडींमुळे महाराष्ट्र-मॉरिशस स्नेहबंधाचा नवा अध्याय लिहिला जात असल्याचा ठाम विश्वास व्यक्त करण्यात आला.

मॉरिशसमधील खासदार अर्विन बाबाजी, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनचे मुख्य धर्मगुरु गुरुजी संताराम राजू, मॉरिशस मराठी मंडळी फेडरेशनचे अध्यक्ष बलराज नारू, मॉरिशस मराठी कल्चरल सेंटर ट्रस्टचे अध्यक्ष धनीराव भिवाजी, मॉरिशसमधील मराठी स्पिकिंग युनियनचे अध्यक्ष भालचंद्र गोविंद अशा अनेक उचचपदस्थ मराठी मंडळींशी दौऱ्याच्या निमित्ताने विविध विषयांवर रविंद्र चव्हाण यांनी चर्चा केली. तसेच मेलरोझ श्री गजानन सरस्वती मंदिर, मॉंट रोचेस मराठी मित्र मंडळी, विठोबा रखुमाई मराठा मंदिर, डागोटियर मराठी शिव मंदिर, लेसपेरान्स मराठी गणोबा मंदिर, प्रोव्हिडेन्स मराठी मित्र मंडळ आणि पाल्मा मराठी सभा या संस्थांना महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्यावतीने रविंद्र चव्हाण यांनी अनुदानाचे धनादेश सुपूर्द केले.

# कांदा उत्पादकांसाठी ठाम लढा

**आमदार काशिनाथ दाते सरांची अनुदानासाठी आक्रमक मागणी**



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पारनेर–** राज्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांच्या प्रश्नावर आज विधान भवन, मुंबई येथे मा. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली महत्त्वपूर्ण आढावा बैठक पार पडली. या बैठकीत पारनेरनगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते सरांनी शेतकऱ्यांच्या हिताचा मुद्दा ठामपणे मांडत कांद्याला अनुदान देण्याची जोरदार मागणी केली.

उपमुख्यमंत्री ना. श्रीम. सुनेत्राताई पवार, जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील, कृषिमंत्री ना. दत्तात्रय भरणे, ना. छगन भुजबळ, नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्यातील आमदार तसेच कृषी, पणन व वित्त विभागाचे प्रधान सचिव या बैठकीस उपस्थित होते.

पारनेर मतदारसंघासह राज्यातील कांदा उत्पादक शेतकरी गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत कमी बाजारभावामुळे आर्थिक अडचणीत सापडले आहेत. या पार्श्वभूमीवर मतदारसंघातील शेतकऱ्यांनी वेळोवेळी विविध आंदोलनांद्वारे आपल्या हक्कासाठी आवाज उठवला आहे. या सर्व आंदोलनांची दखल घेत आणि शेतकरी हिताला प्राधान्य देत आमदार काशिनाथ दाते सरांनी बैठकीत ठाम भूमिका मांडली.

> कांद्याला किमान ५ रुपये प्रति किलो अनुदान देऊन शेतकऱ्यांना तातडीने दिलासा द्यावा, शेतकऱ्यांच्या वाढत्या उत्पादनखर्चाच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय अत्यंत आवश्यक आहे, मुंबई विधानभवनात झालेल्या बैठकीत मुख्यमंत्री सकारात्मक विचार करुन शेतकरी हिताचे निर्णय होईल.
>
> **आ. काशिनाथ दाते सर**
> (विधानसभा सदस्य)

या मागणीची दखल घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कृषी, पणन व वित्त विभागाच्या प्रधान सचिवांची अभ्यास समिती स्थापन करून आठ दिवसांत अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. अहवाल प्राप्त झाल्यानंतर योग्य तो निर्णय घेऊन अनुदान मंजूर करण्यात येईल, असे आश्वासन त्यांनी दिले. या बैठकीत आमदार काशिनाथ दाते सरांनी शेतकऱ्यांच्या भावना प्रभावीपणे मांडत त्यांच्या न्याय्य हक्कासाठी सातत्याने लढा देण्याची भूमिका पुन्हा अधोरेखित केली. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना लवकरात लवकर दिलासा मिळावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे

# दसरे नगरात श्रीराम जन्मोत्सव उत्साहात साजरा

**महिला भाविकांची लक्षणीय उपस्थिती । स्वराज प्रतिष्ठानचा भक्तिमय सोहळा**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातील दसरे नगर परिसरात स्वराज प्रतिष्ठानच्या वतीने गुरुवारी (दि. २६ मार्च) श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात व भक्तिमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. उपस्थित महिला भाविकांनी भगवान श्रीराम जन्माचा पाळणा हलविला.

कार्यक्रमाची सुरुवात प्रभू श्रीरामांच्या प्रतिमेच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी राम परिसर रामनामाच्या गजराने, भजन-कीर्तन, आरती आणि धार्मिक वातावरणाने भारावून गेला होता. उपस्थित भक्तांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेत श्रीराम जन्मोत्सवाचा आनंद लुटला. या कार्यक्रमास आमदार संग्राम जगताप, महापौर ज्योतीताई गाडे, नगरसेविका रोशनीताई त्र्यंबके, रूपालीताई वारे, संध्याताई पवार यांनीही कार्यक्रमास उपस्थित राहून सोहळ्याची शोभा वाढवली

या सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी किशोर वाणी होते. त्यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे उत्कृष्ट नियोजन करण्यात आले. यावेळी प्रमुख उपस्थितांमध्ये बाळकृष्ण नरवडे, भाऊसाहेब आव्हाड, अजित शहाणे, महादेव साबळे, वासुदेव आव्हाड, सारंग शहाणे, तुकाराम मिसाळ, राजू गीते, योगेश जावळे, मयूर सूर्य पुजारी तसेच शेखर बनकर यांची उपस्थिती होती.



कार्यक्रमादरम्यान विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. राम जन्माच्या पवित्र क्षणी आरती करण्यात आली व त्यानंतर प्रसादाचे वितरण करण्यात आले. लहान मुलांपासून ते ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनी या सोहळ्यात उत्साहाने सहभाग घेतला. स्वराज प्रतिष्ठानच्या या उपक्रमाद्वारे संपूर्ण परिसरात धार्मिक वातावरण निर्माण झाले होते.

# गोंदवलेकर महाराज मंदिरात श्रीराम जन्मोत्सव साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** सावेडी उपनगरातील शिलाविहार येथील श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज मंदिरात आज दुपारी १२ वाजता श्रीराम नवमी निमित्त श्रीराम जन्म उत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

गुढीपाडव्यापासून ते रामनवमी पर्यंत मंदिरात रोज दुपारी साडेतीन ते साडेपाच श्रीराम जय राम जय जय राम हे नामस्मरण करीत नाम जप सप्ताह आयोजित करण्यात आला होता. रामनवमीला श्रीराम जन्मोत्सव साजरा करून या सप्ताहाची सांगता करण्यात आली या राम जन्म सोहळ्यास महिला



मोठ्या संख्येने उपस्थित होते. श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांनी आपले आयुष्य संपूर्ण राम नामाचे महत्त्व सांगण्यात खर्च केले. या मंदिरात गेली तीस वर्षापासून अखंड हरिनाम सप्ताह, श्रीराम जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरे होतात. ब्रह्मचैतन्य सेवाभावी मंडळातील सदस्य यासाठी उपस्थित असतात महाप्रसादाने सांगता करण्यात आली भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

# माहेश्वरी भवन चेन्नई येथे गणगौर सण उत्साहात साजरा



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** राजस्थानातील एक प्रमुख असलेला सण गण (शिव) गौर (पार्वती) हा नुकताच साहुकारपेठ, माहेश्वरी भवन, चेन्नई, मद्रास येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

चेन्नई येथील सर्वश्री गोपाल डागा, बन्सीलाल बिहानी, राधेश्याम मुंदडा, विनोद द्वारकाणी, ग्वालदास मोहता, पन्नालाल बिहानी, इंदर राठी, महेश दमाणी, सुशील झंवर, कृष्ण कुमार राठी आदि मान्यवर यावेळी उपस्थित होते. धार्मिक विधी तथा गण गणगौर प्रसाद वाटप करण्यात आले. या स्थळी जे कोणी भाविक येतात ते परमेश्वराला आपले मनातील मागणी मागतात व त्यांची इच्छा पूर्ण होते. काही भाविकांनी अशी माहिती अग्रसेन टाइम्सचे कार्यकारी संपादक सचिन मुंदडा यांना या वेळी दिली. गणगौर हा राजस्थानचा एक प्रमुख सण आहे. हा उत्सव होळीच्या दुसर्या दिवसापासून सुरू होऊन १६-१८ दिवस चालतो. चैत्र शुक्ल तृतीयेला (२०२६ मध्ये २१ मार्च रोजी) याची मुख्य पूजा केली जाते.

हा सण का साजरा केला जातो?

गण (शिव) औ गौर (पार्वती) : हा सण भगवान शिव आणि माता पार्वती यांच्या पवित्र मिलनाचे प्रतीक आहे. विवाहित स्त्रिया पतीच्या दीर्घायुष्यासाठी आणि सुखी वैवाहिक जीवनासाठी व्रत ठेवतात, तर अविवाहित मुलीस इच्छित वर मिळावा म्हणून प्रार्थना करतात. हा सण वसंत ऋतू, नवीन पीक आणि निसर्गाच्या नवचैतन्याशी देखील जोडलेला आहे.

कसा साजरा केला जातो?

माती किंवा लाकडाच्या गौरी-ईसर (पार्वती-शिव) मूर्ती बनवून त्यांची रोज पूजा केली जाते. पूजेमध्ये फुले, फळे, मेहंदी आणि अक्षता अर्पण केल्या जातात. स्त्रिया पारंपारिक घागरा-ओढणी आणि दागिने परिधान करून, मेहंदी लावून लोकगीते गातात आणि 'घूमर'सारखी नृत्ये करतात. काही ठिकाणी अविवाहित मुली 'घुडलिया' (दिवे लावलेला माठ) घेऊन गल्लोगल्ली गाणी गातात. सणाच्या शेवटच्या दिवशी वाजत-गाजत या मूर्तींचे तलाव किंवा जलाशयात विसर्जन केले जाते. जयपूर आणि उदयपूरमध्ये या निमित्ताने राजेशाही मिरवणूक आणि नौका-जुलूस काढला जातो.

खास आकर्षण काय असते? रंगबेरंगी पोशाख, घेवर आणि कांचरीसारखी मिठाई, लोकगीते आणि बोरला, बाह-बंद सारखे पारंपारिक दागिने. हा सण कौटुंबिक आणि सामाजिक बंध दृढ करणारा असून स्त्री-शक्ती आणि श्रद्धेचा एक मोठा उत्सव आहे. गणगौर सणाशी संबंधित मुख्य पदार्थ 'घेवर' हा आहे.

# स्व. अरुण काका जगताप जयंतीनिमित्त मनगाव येथे किराणा वाटप

**''समाजाशी नाळ घट्ट जोडणारे नेते'' – डॉ. राजेंद्र धामणे । अन्नदानातून समाजसेवेचा वारसा जपला**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिंगवे नाईक येथील माऊली सेवा प्रतिष्ठान संचलित मनगाव येथे स्वर्गीय आमदार अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त गरजूंना किराणा वाटपाचा सामाजिक उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमातून समाजातील वंचित घटकांना मदतीचा हात देत काकांच्या कार्याची आठवण जागविण्यात आली.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे शहर जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, माजी सभापती कुमारसिंह वाकळे, नगरसेवक डॉ. सागर बोरुडे, बाबुशेठ नागरगोजे, केशव नागरगोजे, नितीन घोडके, पंकज वाकळे, दीपक खेडकर, डॉ. राजेंद्र धामणे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना डॉ. राजेंद्र धामणे म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप यांनी राजकारणापेक्षा समाजकारणाला अधिक महत्त्व दिले. त्यांनी समाजाशी नाळ घट्ट जोडून ठेवत गोरगरिबांचे आधार बनण्याचे काम केले. त्यांच्या कार्याचा वारसा पुढे चालू ठेवणे हीच खरी श्रद्धांजली असून अशा सामाजिक उपक्रमांतून सर्वसामान्यांच्या गरजा पूर्ण करण्याचा प्रयत्न होत आहे. नगरसेवक संपत बारस्कर, कुमारसिंह वाकळे, डॉ. सागर बोरुडे आणि बाबुशेठ नागरगोजे यांनी



सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जपत हा उपक्रम राबविला असून, या माध्यमातून काकांच्या कार्याची आठवण सतत जिवंत राहील, असेही त्यांनी नमूद केले.

संपत बारस्कर म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप हे प्रत्येकाशी आत्मीयतेने संवाद साधत आणि लोकांना जेवणासाठी आग्रह करीत. अन्नदान हे सर्वश्रेष्ठ दान मानले जाते. त्यामुळे अशा उपक्रमातून त्यांच्या विचारांचे अनुकरण करणे हे आपले कर्तव्य आहे.

ते पुढे म्हणाले की, गोरगरिबांना मदतीचा हात देत काकांच्या कार्याची आठवण जपण्यासाठी असे उपक्रम सातत्याने राबवले जातील. मनगाव परिसरातील महिलांची सेवा करण्याचे काम डॉ. राजेंद्र धामणे करत असून, त्यांचे कार्य अत्यंत कौतुकास्पद आहे. रस्त्यावरील महिलांना निवारा देण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही त्यांच्या माध्यमातून सुरू आहे.कुमारसिंह वाकळे म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका आज आपल्यात नसले तरी त्यांच्या कार्याची आठवण कायम प्रेरणा देणारी आहे. समाजात कसे वागावे, लोकांना कशी मदत करावी, त्यांच्या सुखदुःखात कसे सहभागी व्हावे, हे त्यांनी आपल्या कार्यातून दाखवून दिले.ते पुढे म्हणाले की, चांगल्या कामांच्या माध्यमातूनच माणूस माणसांशी जोडला जातो. त्यांच्या जयंतीनिमित्त मनगाव येथे किराणा वाटप करून त्यांच्या विचारांना अभिवादन करण्यात आले असून, डॉ. राजेंद्र धामणे यांचे समाजाप्रती असलेले कार्यही अनुकरणीय आहे.

# पैठणमध्ये आगग्रस्त व्यापाऱ्यास आमदारांची मदत; १ लाखांचा धनादेश सुपूर्द



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** पैठण शहरातील रामभाऊ एडके यांच्या 'ओंकार भांडी भांडार' या दुकानाला लागलेल्या आगीत मोठे आर्थिक नुकसान झाले होते. या पार्श्वभूमीवर स्थानिक आमदार विलास बापू भुमरे यांनी तत्परता दाखवत पीडित कुटुंबाला १ लाखांची आर्थिक मदत जाहीर केली.

या मदतीचा धनादेश नुकताच संबंधित व्यापाऱ्यांच्या हस्ते सुपूर्द करण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष भूषण काका, उपनगराध्यक्ष तुषार दादा, नगरसेवक कृष्णा मापारी, जितू परदेशी, नामदेव काका खरात, स्वप्नील भाऊ साबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

आगीत सर्वस्व गमावलेल्या कुटुंबाला या मदतीमुळे मोठा दिलासा मिळाला असून, आमदार भुमरे यांच्या या कृतीचे परिसरात सर्वत्र कौतुक होत आहे. आपुलकी आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवणारी ही मदत असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

(पान १ वरून)

## खासदार नीलेश लंके यांनी घेतली संरक्षण मंत्र्यांची भेट

काढण्याची मागणी करण्यात आली. या तलावातील गाळामुळे जलसाठा कमी झाला असून, तो काढल्यास परिसरातील शेती व पिण्याच्या पाण्याच्या समस्येवर मोठा दिलासा मिळू शकतो, असे लंके यांनी स्पष्ट केले.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी खासदार लंके यांनी मांडलेल्या सर्व मुद्द्यांची गांभीर्याने दखल घेत संबंधित अधिकाऱ्यांकडून अहवाल मागवून आवश्यक ती कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले. या भेटीमुळे अहिल्यानगर (दक्षिण) मतदारसंघातील विविध प्रलंबित प्रश्नांना गती मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, खासदार लंके यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याचे सर्व स्तरांतून स्वागत केले जात आहे.

## शासनाच्या योजना कागदावर न राहता थेट जनतेपर्यंत पोहोचवावे – आ. काशिनाथ दाते सर

परिषद सदस्य वसंतराव चेडे, तहसीलदार गायत्री सौंदाने, तालुका कृषी अधिकारी गजानन घुले, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष विक्रमसिंह कळमकर, स्वप्नील ठुबे, अर्जुन नवले, संतोष ठुबे, बाबा चेडे, रमेश गाडगे यांसह विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

तसेच सेतू केंद्र चालक, संजय गांधी योजना शाखा, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ, वनविभाग, सामाजिक वनीकरण, बचत गट, भूमिअभिलेख, प्राथमिक आरोग्य केंद्र, शिक्षण, सहकार, दुय्यम निबंधक आदी विभागांचे प्रतिनिधी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाचा लाभ घेतला.

या शिबिरातून अनेक नागरिकांच्या समस्या जागेवरच निकाली काढण्यात आल्या असून तालुक्यातील इतर मंडलांसाठी ज्या ज्या वेळी ह्या शिबिराचे आयोजन करण्यात येईल त्या त्या वेळी सबंधित मंडलातील नागरिकांनी आपल्या शासन दरबारी असलेल्या समस्या सोडविण्यासाठी लाभ घ्यायला हवा.

## नवीपेठेतील श्रीराम मंदिरात श्रीराम जन्मोत्सव भक्ती, उत्साह आणि जयघोष

स्वयंसेवकांनी शिस्तबद्ध पद्धतीने भाविकांना मार्गदर्शन करत संपूर्ण व्यवस्थापन यशस्वी केले. कार्यक्रमानंतर सर्व भाविकांना प्रसादाचे वितरण करण्यात आले.

गेल्या १९ वर्षांपासून सातत्याने राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमांतर्गत होळी पौर्णिमेपासून ३१ दिवस शहरभर सामूहिक हनुमान चालीसा पठण, भजन संध्या आणि धर्मप्रसाराचे विविध कार्यक्रम घेतले जातात. यंदाही या उपक्रमाला मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद मिळत असून, शहरात सर्वत्र भक्तिमय वातावरण निर्माण झाले आहे.

प्रत्येक घराघरांत श्रीरामभक्तीचा संदेश पोहोचावा या उद्देशाने कार्यक्रमादरम्यान मोफत हनुमान चालीसा पुस्तिकांचे वितरण करण्यात आले. तसेच दररोज श्रीरामचरितमानसातील चौपाई वाचन, आरती व प्रसाद वितरणाने कार्यक्रमाचा समारोप केला जात आहे.

श्रीराम जन्मोत्सवाच्या दिवशी मंदिर दिवसभर दर्शनासाठी खुले ठेवण्यात आले आहे. दिवसभरात हजारो भाविकांनी श्रीराम लल्लाचे दर्शन घेत आध्यात्मिक समाधानाचा अनुभव घेतला.

दरम्यान, आज सायंकाळी आणि रात्रीच्या सत्रात भजन, कीर्तन व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, राजज्योती नगर मित्र मंडळ व श्री देसर्डा परिवार यांच्या संयुक्त विद्यमाने बुरुडगाव रोड येथे महा हनुमान चालीसा पाठ पार पडणार आहे. रात्री ८ ते १०.३० या वेळेत होणाऱ्या या कार्यक्रमात भाविकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. यंदा प्रथमच ''श्रीराम जय राम जयजय राम'' या तारक मंत्राचा संगीतमय जप हे विशेष आकर्षण ठरणार आहे. तसेच गुरुवार, दि. २ एप्रिल रोजी पहाटे ६ वाजता श्री हनुमान जन्मोत्सवही याच ठिकाणी साजरा करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष प्रितम मुथ्था व उपाध्यक्ष निखिल शेटीया यांनी दिली. त्यांनी या भव्य सोहळ्याच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व स्वयंसेवक, कार्यकर्ते व भाविकांचे आभार मानले.

## आरोग्यसेवा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचे कार्य कौतुकास्पद - आ. संग्राम जगताप

उपमहापौर गणेश भोसले, अनिल बोरुडे, भाजप शहर जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते, भाजप गटनेते शारदाताई ढवण, माजी सभापती अविनाश घुले, प्रा. माणिक विधाते, नगरसेवक निखिल वारे, गणेश कवडे, दत्ता गाडळकर, सुजय मोहिते, ऋग्वेद गंधे, ह.भ.प. अमित महाराज धाडगे, बाबासाहेब सानप, सागर मुर्तडकर, ज्ञानेश्वर रासकर, डॉ. प्रकाश गरुड, रोहन सानप, अभिजीत बोरुडे, सुशांत जाधव आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, स्वर्गीय अरुण काका जगताप यांनी नेहमीच समाजहितासाठी कार्य करत गरजू नागरिकांना मदतीचा हात दिला. त्यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून सकारात्मक दृष्टिकोनातून सामाजिक बांधिलकी जोपासणे हीच खरी श्रद्धांजली आहे. ते पुढे म्हणाले की, नागरिकांच्या घरापर्यंत आरोग्य सेवा पोहोचविण्याचे कार्य साई द्वारका सेवा ट्रस्टच्या माध्यमातून केले जात आहे. आजच्या महाआरोग्य शिबिरामध्ये शहरातील सुमारे १५ नामांकित रुग्णालयांच्या माध्यमातून नागरिकांची तपासणी करण्यात येत आहे. तसेच आयुष्यमान भारत योजनेअंतर्गत आरोग्य कार्डचे वाटपही करण्यात आले.
या शिबिरात तपासणी करण्यात आलेल्या रुग्णांपैकी ज्यांना शस्त्रक्रियेची आवश्यकता आहे, अशा रुग्णांच्या पुढील उपचाराचा संपूर्ण खर्च श्री साई द्वारका सेवा ट्रस्टच्या माध्यमातून करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.
''रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा आहे,'' असेही त्यांनी यावेळी नमूद केले. स्व. अरुण काका जगताप यांच्या जयंतीनिमित्त आयोजित या महाआरोग्य शिबिरातून हजारो नागरिकांना मोफत आरोग्य सेवा मिळाली असून, अशा उपक्रमांमुळे समाजात आरोग्याबाबत जागरूकता वाढण्यास मोठी मदत होत आहे.